# राशिभविष्य - एप्रिल, २०२१.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

=====================================================================

**आपणां सर्वांना आपले नवे वर्ष शक १९४३ गुढी पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा !**

======================================================================

**सूचना- प्रत्येक राशिभविष्याच्या अखेरीस त्या राशीच्या जन्मनक्षत्रांसाठी त्या त्या जन्मनक्षत्राचा तारक मंत्र दिला आहे. आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार व अन्य समस्या यांचे निवारण होते, असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही तसा प्रयत्न करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास आम्हांस कळवावे.**

======================================================================

**(१) मेष -** या राशीच्या व्ययस्थानी महिन्याच्या पूर्वार्धात रवि -बुध असून ते महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम स्थानी जात आहेत. त्यामुळे महिन्याच्या संपूर्ण काळात ते दोन्ही ग्रह प्रतिकुल असणार आहेत. त्यांच्यामुळे शरीरपीडा, मनोभंग, अपयश, पीछेहाट, मानहानी, धननाश, मित्रद्रोह, कुसंगतीचा त्रास, चिंता, मनस्ताप आणि अनारोग्य अशापैकी घटना घडण्याची शक्यता आहे. या राशीच्या प्रथम स्थानी शुक्र, हर्षल आहेतच. पण हर्षलमुळे स्वभाव चंचल, लहरी, अस्थिर होण्याची शक्यता आहे. पण हा हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व उपयुक्त होईल. केवळ शुक्रामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील, वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. या राशीच्या धनस्थानी मंगळ व राहू असे दोन ग्रह असून येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी जात आहे. हा मंगळ व राहू दोन्ही ग्रह प्रतिकुल होतील व त्यांच्यामुळे आर्थिक चिंता, कुटुंबात कलह , पूर्वार्धात अनारोग्य होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात येथील मंगळ या राशीच्या तृतीय स्थानी मिथुन राशीत गेल्यावर अनुकुल होईल. त्याच्यामुळे धैर्य, हिम्मत, महत्वाकांक्षा वाढेल, हातून कर्तबगारी घडेल, प्रवास योग येईल. पण इजा होणेही संभवते. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी वृश्चिक राशीत केतु असून तो अनारोग्यकारक होईल व त्याच्यामुळे त्वचा रोग, रक्तविकार, मुखदंत रोग अशापैकी आजार होण्याची शक्यता आहे. तसेच हा केतु अपघातकारक असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. त्याशिवाय त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनातील सुखात बाधा येणेही संभवते. या राशीच्या दशम स्थानी मकर राशीत शनि असून तो महिन्याच्या पूर्वार्धात लोखंड, कोळसा यांचा व्यापार असणारांना अनुकूल व लाभदायक होईल; पण

महिन्याच्या उत्तरार्धात तो अविस्मरणीय फलदायी होईल. या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून नेपच्यूनमुळे आर्थिक समस्या व कुमार्गी मित्रापासून त्रास होणे संभवते. पण गुरु ग्रह अनुकुल होईल व त्याच्यामुळे इच्छा आकांक्षा पूर्ण होतील, धनलाभ होईल, काही विवाहेच्छूना विवाहयोग येईल व या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. मित्रलाभ होईल.श्रद्धा असेल तर श्रीगजाननाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "श्रीगणेश अथर्वशीर्षा"चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी "ओम अश्विनी कुमारभ्यां नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी "ओम यमाय नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः:" मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ -** या राशीच्या प्रथम स्थानी मंगळ व राहू असे दोन ग्रह असून ते दोन्ही ग्रह या महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. राहूमुळे अपमान होतील. त्यामुळे मनात डूख धराल. काही मंडळींना वातविकार त्रस्त करतील. मंगळामुळे स्वभाव हट्टी होईल. मानापमानाचा अहंकार उफाळून येईल. अकारण शरीरपीडा, श्रम, दगदग कराल. उष्णताविकाराचे आजार त्रस्त करतील. नोकरदार मंडळींना नोकरीत काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. महिन्याच्या उत्तरार्धात येथील मंगळ या राशीच्या धनस्थानी गेल्यावर आर्थिक समस्या त्रस्त करतील. या राशीच्या सप्तम स्थानी वृश्चिक राशीत केतु असून त्याच्यामुळे मनस्थिती अस्थिर राहील. वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येऊ शकेल. या राशीच्या भाग्यस्थानी मकर राशीत शनि असून त्याच्यामुळे दूरच्या प्रवासाचे योग येतील. या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील गुरु बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. वरिष्ठ कर्तृत्वाचे कौतुक करतील. काही भाग्यवंत मंडळींना मानसन्मान प्राप्त होईल. येथील नेपच्यून मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थांचे व्यापारी यांना लाभदायक होईल. पण त्याच्यामुळे मनस्थिती अस्थिर होण्याची शक्यता आहे. या राशीच्या लाभस्थानी मीन राशीत रवि-बुध असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी मेष राशीत जात आहेत. ते दोन्ही ग्रह महिन्याच्या पूर्वार्धातच अनुकुल होतील. त्यामुळे या राशीच्या मंडळींनी जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. बुधामुळे मित्रलाभ होईल व सुखसमाधान लाभेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल व अपयश, मानहानी, शरीरपीडा होणे संभवते. श्रद्धा असेल शिव शंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "श्रीशिवलीलामृत

स्तोत्रा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी
“ओम अग्नये नमः”: मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी “ओम ब्रह्माय नमः:” मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ ओम सोम सोमाय नमः:” मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या व्ययस्थानी वृषभ राशीत मंगळ व राहू असून येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम स्थानी जात आहे. त्यामुळे हा मंगळ या महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. त्यामुळे मनस्थिती अस्वस्थ राहील. वाद, भांडणे होणे, मानहानी होणे, स्वभाव हट्टी, चिडखोर, संतापी होणे संभवते. अकारण श्रम., दगदग केली जाईल. पण राहू अनुकुल होईल. त्याच्यामुळे काहीना अर्थलाभ होईल, काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. असे असले तरी या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे आचारविचार उच्च राहतील, आरोग्य उत्तम राहील, सहकार्य लाभेल. या राशीच्या अष्टम स्थानी मकर या स्वराशीत शनि असून तोही प्रतिकुल होणे संभवते. त्याच्यामुळे अनारोग्य, असमाधानकारक घटना, अपेक्षाभंग होण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून हे दोन ग्रह असून ते दोन्ही ग्रह अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करण्यास अनुकुल होतील. यांच्यामुळे प्रवासयोग येतील व काहीजणांना तर परदेशगमनाची संधीही मिळेल. या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून ते दोघेही महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी जात आहेत. त्यामुळे या संपूर्ण महिन्याच्या काळात ते अनुकुल होतील आणि त्यांच्यामुळे सर्वांना आरोग्य लाभेल, नोकरदार मंडळींपैकी काहींना बढती, पगारवाढ, तर क्वचित कोणास एखादे उच्च पद मिळणेही शक्य आहे. बुधामुळे मानसिक, कौटुंबिक सुख, धनलाभ, मित्रलाभ होणे संभवते. पण या लाभस्थानी शुक्र व हर्षल असे दोन ग्रह प्रथमपासून आहेतच. त्यापैकी शुक्र पूर्णपणे अनुकुल होईल व त्याच्यामुळे सुखसमाधान लाभेल, अर्थप्राप्ती होईल. मन:शांती लाभेल. पण हर्षलमुळे मैत्रीत बाधा येणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून, श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ओम सोम सोमाय नमः:” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी “ ओम नमः: शंकराय “ मंत्राचा व ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी “ ओम अदितीये नमः:” मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या राशीच्या पंचम स्थानी वृश्चिक राशीत केतू असल्यामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. या राशीच्या सप्तम स्थानी मकर या स्वराशीत शनी असून त्याच्यामुळे वृत्ती शांत राहील. पण विवाहेच्छूंना विवाहयोग संभवत नाही. या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील नेपच्यून जलभयकारक आणि विषभयकारक असल्यामुळे जलप्रवास करू नका. तसेच खोल पाण्यात पोहू नका. येथील गुरूमुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होईल. काही मंडळींना वारसा हक्काने असा अचानक धनलाभ होईल. या राशीच्या भाग्यस्थानी मीन राशीत रवि-बुध असे दोन ग्रह असून ते दोन्ही ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. रविमुळे मानसिक ताण वडील मंडळींकडून विरोध, भय, निराशा, अनारोग्य होणे संभवते. बुधामुळे नियोजित कार्यात अडथळे, दिरंगाई होणे संभवते. तसेच वाद, भांडणे होणेही शक्य आहे. जपा. या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत शुक्र व हर्षल असे दोन ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात भाग्यस्थानी असलेले रवि -बुध या राशीच्या दशम स्थानी जात आहेत. येथील शुक्र व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण करील. पण हर्षल, रवि -बुध अनुकुल होतील. रविमुळे इच्छाआकांक्षा पूर्ण होतील. नियोजित कार्यात यश मिळेल. मोठ्या लोकांच्या ओळखी होतील. प्रतिष्ठा वाढेल. बुधामुळे मानसिक, कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. काही मंडळींना धनलाभही होईल. हर्षलमुळे उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना नोकरीत बढती, व्यवसायात लाभ होईल. या राशीच्या लाभस्थानी वृषभ राशीत मंगळ व राहू असून या राहूमुळे संततीविषयक एखादी चिंता त्रस्त करील. अधिकारी मंडळींकडून अधिकाराचा गैर वापर होणे संभवते. मंगळ ग्रहामुळे काही मंडळींना कष्ट परिश्रम करूनच अर्थलाभ होईल. मित्रांशी भांडणे होतील. पण एखादी मौल्यवान वस्तू मिळण्याची शक्यताही नाकारता येत नाही. येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात व्ययस्थानी मिथुन राशीत गेल्यावर प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे भांडणे होणे, मानहानी होणे, आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी “ओम अदितीये नमः:” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी “ ओम बृहस्पतये नमः:” मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी “ओम सर्पाय नमः:” मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या चतुर्थ स्थानी वृश्चिक राशीत केतु असून त्याच्यामुळे घरीदारी कोणाशी पटणार नाही. कसली तरी चिंता त्रस्त करील. शिवाय तो विषभयकारीही आहे. सबब बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी मकर या स्वराशीत शनि असून तो दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल. पण त्याच्यामुळे गैरसमज, वाद, भांडणे होणे संभवते. त्यातून शत्रुत्व निर्माण होण्याची शक्यता असते. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत गुरु-नेपच्यून हे दोन ग्रह असून गुरु ग्रहामुळे प्रेमसंबंध असतील तर ते दृढ होण्याची शक्यता आहे. काही मंडळींना अर्थलाभ तर काहींना पुत्रलाभ होणेही संभवते. प्रवासयोग येतील. नवे नातेसंबंध जोडले जातील. पण येथील नेपच्यून प्रतिकुल असल्याने त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी मीन राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून रवि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, कार्य-अपयश, इच्छाआकांक्षा अपूर्ण राहणे, संततिसुखात बाधा येणे, अशापैकी घटना घडण्याची शक्यता असते. पण बुध ग्रह अनुकुल होईल त्याच्यामुळे कार्यसिद्धी होऊ शकेल. यश लाभेल व सुखही लाभेल. येथील रवि -बुध महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी मींन राशीत जात आहेत. या स्थानी शुक्र व हर्षल असे दोन ग्रह आहेतच. येथील शुक्रामुळे गुरुकृपा, थोरकृपा, सुसंगती, ऐषाराम, काही मंडळींना कीर्ति -प्रसिद्धीही मिळू शकेल. हर्षलमुळे शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना संशोधन कार्यात प्रगती करणे शक्य होईल. काही मंडळीना दूरच्या प्रवासाचे किंवा परदेशगमनाचे योग येतील. पण महिन्याच्या उत्तरार्धात अष्टम स्थानी असलेले रवि -बुध या भाग्यस्थानी आल्यावर प्रतिकुल होतील व त्यांच्यामुळे मानहानी, प्रवासात मनस्ताप, भांडणे, कार्यदिरंगाई अशा घटना घडण्याची शक्यता आहे. म्हणून जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करा. या राशीच्या दशम स्थानी वृषभ राशीत मंगळ व राहू असे दोन ग्रह असून येथील मंगळामुळे काही मंडळींच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडतील, काही मंडळीना हातचे सोडून नवीन काही करावेसे वाटेल. नोकरदार मंडळींना नोकरीत कामाचा ताण सहन करावा लागेल, काहींची वरिष्ठांशी भांडणे होतील. पण येथील राहू अनुकुल होईल व नोकरदार मंडळींपैकी काहींना यश, सत्ता, अधिकार, सन्मान असे काही मिळू शकेल. महिन्याच्या उत्तरार्धात येथील मंगळ या राशीच्या लाभस्थानी मिथुन राशीत गेल्यावर काही मंडळींना कष्ट-परिश्रमानेच अर्थप्राप्ती होईल. मित्रांशी वितुष्ट येणे संभवते. पण काही भाग्यवंत मंडळींना एखादी मौल्यवान वस्तू प्राप्त होणेही संभवते. श्रद्धा असेल तर “कुलदैवता”ची उपासना मन:शांती देईल. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी “ओम

पितराय नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी "ओम भगाय नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमे नमः" मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या-** या राशीच्या तृतीय स्थानी वृश्चिक राशीत केतु असून तो मानसिक दु:ख देतो. त्यामुळे आ आध्यात्मिक उपासनेमुळे मन:शांती मिळेल. पण या राशीच्या व्यापारी मंडळींना त्याच्यामुळे स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. या राशीच्या पंचम स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून तो चिकाटीचा गुण देतो. पण व्यावहारिक, संशयी, स्वार्थी बुद्धी निर्माण करतो. या राशीच्या षष्ठ स्थानी राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून नेपच्यूनमुळे काहीजणांना उगीचच आपल्याला काही आजार झाला असल्याची भावना त्रस्त करील. काही मंडळींना काल्पनिक चिंता त्रस्त करतील. त्याशिवाय फसवणूक होणेही संभवते. पण गुरु ग्रह अनुकुल होईल व आरोग्य उत्तम राहील. या राशीच्या सप्तम स्थानी मीन राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून येथील रवि अनारोग्यकारक होईल व त्याच्यामुळे इच्छा आकांक्षा अपूर्ण राहतील. पण तो केंद्रातील रवि असल्यामुळे भाग्योदयकारक होणेही संभवते. बुध ग्रहही प्रतिकुल असून त्याच्यामुळे वाद, भांडणे, दु:खदायक घटना घडणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत शुक्र व हर्षल असे दोन ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात सप्तम स्थानी असलेले रवि -बुध या राशीच्या अष्टम स्थानी जात आहेत. या स्थानी असलेला शुक्र या राशीच्या वृद्ध मंडळींना प्रतिकुल होईल. पण त्याच्यामुळे काही मंडळींना कमी श्रमात अपेक्षित अर्थलाभ होईल. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होईल. पण हर्षल अपघातकारक असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह प्रतिकुल व अनारोग्यकारक होईल. इच्छाआकांक्षा अपूर्ण राहतील. संततिसुखात बाधा येणे संभवते. हाती घेतलेल्या कार्यात अपयश येणे संभवते. पण बुध ग्रह अनुकुल होईल व त्याच्यामुळे सुखसमाधान लाभेल. या राशीच्या भाग्यस्थानी वृषभ राशीत मंगळ व राहू असे दोन ग्रह असून येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी मिथुन राशीत जात आहे. मंगळामुळे प्रवासात त्रास, मनस्ताप होणे संभवते. त्यामुळे शक्यतो प्रवास करू नका. महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडणे संभवते. काही मंडळींना हातची नोकरी सोडून नवीन काही करावेसे वाटेल. नोकरदार मंडळींना कामाचा ताण सहन करावा लागेल. राहूमुळे प्रवासयोग येतील. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम

आर्यमे नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी "ओम सूर्याय नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः :" मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा -** या राशीच्या धनस्थानी वृश्चिक राशीत केतु असून त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करतील. या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर या स्वराशीत शनि असून त्याच्यामुळे गृहसौख्य हानी होणे संभवते. तसेच दु:खही सहन करावे लागेल. त्यामुळे नैराश्य येईल. जपा. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून नेपच्यूनमुळे मनस्थिती अति भावनाशील होईल. पण तो गूढ संशोधन कार्यात कार्यरत असणारांना प्रगतिकारक होईल. तसेच अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक उन्नती करणे शक्य होईल. गुरु ग्रहही पूर्णपणे अनुकुल होईल व त्याच्यामुळे प्रेमसंबंध असतील तर ते दृढ होतील. अर्थलाभ होईल व या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. सर्व सुख मिळेल. या राशीच्या षष्ठ स्थानी मीन राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या पूर्वार्धात दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल. हितशत्रूचा पराभव होईल. पण काही मंडळींना हृदयविकाराचा आजार त्रस्त करीतसे वाटते. बुध ग्रहही महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व त्याच्यामुळे अर्थलाभ होणे संभवते. तसेच कार्यसिद्धी होईल व काही मंडळींना कीर्ती, प्रसिद्धीही मिळू शकेल. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत शुक्र व हर्षल असे दोन ग्रह असून शुक्रामुळे प्रेमिकांचे प्रेमविवाह होतील, वैवाहिक जीवनात सुखसमाधान मिळणार असले तरी हर्षलमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निंर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे अशांनी वाद, भांडणे, संशय अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. महिन्याच्या उत्तरार्धात रवि -बुध या सप्तम स्थानी आल्यावर रवि ग्रह स्वतः:च्या उच्च राशीत केंद्रस्थानी असल्याने भाग्योदयकारक होईल; पण तो अनारोग्यकारक होऊन काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. बुध ग्रहही प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे दु:ख, वाद, भांडणे होणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी वृषभ राशीत मंगळ व राहू असे दोन ग्रह असून ते दोन्ही ग्रह प्रतिकुल व अनारोग्यकारक होतील. शिवाय वैवाहिक जीवनातील सुखात बाधाही निर्माण करतील. तसेच मंगळ ग्रहामुळे हाडमोड होणेही संभवते. त्याशिवाय त्याच्यामुळे जलभय, वीजभय असल्यामुळे जलप्रवास करू नका, खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी मिथुन राशीत जात आहे. त्यावेळी शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात मनस्ताप, मानहानी होण्याची शक्यता आहे. श्रद्धा असेल तर शिवशंकराची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी

स्नान करताना मनापासून, श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः "मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी "ओम वायवे नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः:" मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत केतु असून तो सुखसमाधान देईल; पण त्याच्यामुळे वाहन अपघाताचा धोका आहे. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी मकर या स्वराशीत शनि असून या शनीमुळे काही मंडळींना उत्तम नोकरी मिळू शकेल. काही मंडळींना नवे कार्यक्षेत्र मिळणेही संभवते. पण भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरु ग्रहामुळे कौटुंबिक सुखसमाधान मिळू शकणार असले, काही मंडळींचे स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार होणार असले तरी नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाणे संभवते. नेपच्यूनमुळे घरगुती परिस्थितीत गैरसमज, घोटाळे अशापैकी कारणांनी घरगुती वातावरण गढूळ होणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी मीन राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात हे दोन्ही ग्रह या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत जात आहेत. महिन्याच्या पूर्वार्धात हे दोन्ही ग्रह प्रतिकुल होतील व त्यांच्यामुळे अनारोग्य, अपघात, नोकरीत वरिष्ठांचा त्रास, प्रिय जनांपासून दुरावा, संततिविषयक चिंता, स्त्रीपासून त्रास अशापैकी घटना घडण्याची शक्यता आहे. महिन्याच्या उत्तरार्धात रवि -बुध हे दोन्ही ग्रह अनुकुल होतील व बुधामुळे कार्यसिद्धी होईल व काही मंडळींना कीर्ति -प्रसिद्धी मिळू शकेल. रवि ग्रह दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल, शिवाय तो स्वतः;च्या उच्च राशीत असल्यामुळे हितशत्रू पराभूत होतील व भाग्योदयकारक होईल. या षष्ठ स्थानी मेष राशीत शुक्र-हर्षल असे दोन ग्रह प्रथमपासून आहेतच. पण या शुक्रामुळे कलाक्षेत्रातील मंडळींना उच्च कलागुण असूनही प्रगतीसाठी योग्य संधीच मिळणार नाही. येथील शुक्राच्या प्रेमात शुद्ध प्रेमभावना नसते. त्यामुळे काहीजण व्यसनाधीन होणे संभवते. तसेच काहींवर आळ येण्याची शक्यता आहे. येथील हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल; पण मनस्थिती चंचल, अस्वस्थ होणे संभवते. काही मंडळींना मुदतीचा ताप येणे संभवते. या राशीच्या बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांनी सतत खोल विचार करू नये. कारण काहींना डोकेदुखीचा व क्वचित कोणास मेंदूविकार होणेही संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी वृषभ राशीत मंगळ व राहू असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. शिवाय मंगळामुळे भागीदारीत व्यापार - व्यवसाय असणारांच्या भागीदारीत वाद, भांडणे, गैरसमज, संशय अशापैकी कारणांनी बाधा येणे संभवते. जपा. राहूमुळे मनात कपटी विचार येतील. वाममार्ग धन प्राप्त करण्याचे विचार प्रबळ होतील.. जपा.

येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी मिथुन राशीत जात आहे. त्यावेळी तो अनारोग्यकारक होईल व उष्णताविकारांचे आजार त्रस्त करतील. हाडमोड होणेही संभवते. जलभय आणि वीजभय असल्यामुळेही विजेची उपकरणे सावधानतेने हाताळा . जलप्रवास करू नका. खोल पाण्यात पोहू नका. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी "ओम मित्राय नमः:" मंत्राचा व ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी "ओम इंद्राय नमः:" मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु-** या राशीच्या व्यय स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे स्वभाव चंचल, लहरी होणे संभवते. या राशीच्या धनस्थानी मकर या स्वराशीत शनि असून त्याच्यामुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता आहे. त्याशिवाय आर्थिक समास्याही त्रस्त करतील. या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरुमुळे या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपात प्रकाशित होईल. काही मंडळींना प्रवासाचे योग येतील. पण एखाद्या भावंडाकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. नेपच्यूनमुळे स्वभाव अत्यंत भावनाशील होईल. काही मंडळींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. हा नेपच्यून अध्यात्मात रस असणारांना अनुकुल होईल व उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. शिवाय गूढ संशोधन कार्यासही तो अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी मीन राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून रवि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे संपूर्ण महिन्याच्या काळात अनारोग्य, कार्यदिरंगाई, कौटुंबिक त्रास, संततीचे अनारोग्याची चिंता, नोकरीत वरिष्ठांचा त्रास, प्रिय जनांपासून होणारे दूरत्व अशापैकी घटनांचा असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. पण बुधामुळे महिन्याच्या पूर्वार्धात गृहसौख्य आणि मित्रसुख मिळू शकेल. या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत शुक्र व हर्षल आहेतच. शुक्रामुळे सर्व प्रकारच्या कलाकारांना आपल्या कलेत अपेक्षित प्रगती करणे शक्य होईल. हर्षल उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी वृषभ राशीत राहू व मंगळ असून राहूमुळे स्वभाव धूर्त, कावेबाज होणे संभवते. काही मंडळींना अन्य जातिधर्माच्या लोकांशी असलेल्या व्यावसायिक संबंधामुळे अर्थलाभ होईल. हितशत्रू पराभूत होतील. पण तो विषभयकारी असल्यामुळे बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. मंगळ महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होणार असून त्याच्यामुळे अनारोग्य, आर्थिक नुकसान, अपप्रचाराचा त्रास, चोरी होणे, जीवनसाथी/संगिनीचे अनारोग्य, वैवाहिक जीवनातील कटकटी, अशापैकी

असह्य मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे संभवते. शिवाय ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी गैरसमज, वाद, भांडणे, संशय अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. श्रद्धा असेल तर शिवोपासना व श्रीगणेश उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "श्रीशिवलीलामृत स्तोत्रा"चे व "श्रीगणेश अथर्वशीर्षा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी "ओम निॠतये नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी "ओम उदकाय नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या लाभस्थानी वृश्चिक राशीत केतु असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे प्रवासाचे योग येतील. हाती घेतलेल्या कार्यात यश मिळेल. सर्व सुखांचा उपभोग घेता येईल , व अर्थलाभ होणेही संभवते. या राशीच्या प्रथम स्थानी स्वराशीचा शनि असून त्याच्यामुळे नियोजित कार्यात अडथळे येतील. कुटुंबातील प्रिय जनांपैकी कोणाचे दूरत्व निर्माण झाल्यास नैराश्य येईल. काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. पण स्वतः:च्या व जीवनसाथी/संगिनीच्या अनारोग्याची चिंता त्रस्त करील. जपा. या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरु ग्रहामुळे काही नोकरदार मंडळींना बढती, अधिकार पद असे काही मिळू शकेल. आरोग्य सुधारेल. बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना आपल्या कार्यक्षेत्रात प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होईल. लेखकांना आवडत्या विषयावर लेखन करणे शक्य होईल. तसेच संशोधन कार्यक्षेत्र असणारांनाही तो अनुकुल होईल. पण येथील नेपच्यूनमुळे आर्थिक संकटे व चिंता त्रस्त करतील. या राशीच्या तृतीय स्थानी मीन राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून महिन्याच्या पूर्वार्धात रवि ग्रह अनुकुल व बुध ग्रह प्रतिकुल होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात हे रवि-बुध या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर रवि प्रतिकुल व बुध अनुकुल होईल. महिन्याच्या पूर्वार्धात रविमुळे सर्व प्रकारे सुखसमाधान लाभेल. आरोग्य उत्तम राहील. धनलाभ होईल. नोकरीत वरिष्ठांवर तुमच्या कर्तृत्वाचा प्रभाव पडेल. त्यामुळे काही मंडळींना मानाचे स्थान किंवा क्वचित कोणास एखादे उच्च पद मिळणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात हा रवि प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, कार्यदिरंगाई, दु:ख, कौटुंबिक त्रास, अनाठाई खर्च अशापैकी कारणांनी नैराश्य येणे संभवते. बुध ग्रहामुळे महिन्याच्या पूर्वार्धात अकारण शत्रुत्व निर्माण होणे, हितशत्रूचा त्रास होणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात या बुधामुळे गृहसौख्य, मित्रसुख मिळू शकेल. पण आर्थिक नुकसान होणेही संभवते. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत शुक्र व हर्षल असे दोन ग्रह प्रारंभापासून आहेतच. येथील शुक्रामुळे ऐषाराम, कौटुंबिक सुख मिळेलच. पण ज्यांची शेतीवाडी आहे त्यांना त्यापासून

अधिक लाभ होईल. पण हर्षलमुळे स्वभाव अस्थिर, चंचल, विक्षिप्त असा होईल व त्यामुळे कोणाशी पटणार नाही, सतत तक्रारी करत बसाल, आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही, वास्तुसुख मिळणार नाही. या राशीच्या पंचम स्थानी वृषभ राशीत राहू व मंगळ असे दोन ग्रह असून राहूमुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. पण या राहूमुळे ज्यांचा दलाली, कमिशनवर व्यापार, व्यवसाय आहे त्यांना काळ लाभदायक होईल. येथील मंगळही प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, इजा होणे, मुलांपैकी कोणाच्या अयोग्य आचरणाचा मनस्ताप सहन करावा लागेल. काही मंडळींना स्थावरविषयक समस्या त्रस्त करील. हा मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी मिथुन राशीत गेल्यावर अनारोग्यकारक होईल, अर्थहानी होणे संभवते व काही मंडळींना अपप्रचाराचा मनस्ताप सहन करावा लागेल. श्रद्धा असेल तर श्रीशिवोपासना व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी “ओम विश्वेदेवाय नमः “ मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी “ओम विष्णवे नमः:” मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ ओम वसवे नमः:” मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या दशम स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना हातची नोकरी सोडून नवीन काही करावेसे वाटेल. पण त्यांनी तो विचार मनातून काढून टाकावा व आहे ती नोकरीच करावी. तेच सुखाचे होईल. या राशीच्या व्ययस्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे आर्थिक फसवणूक होणे संभवते. म्हणून आर्थिक व्यवहार सावधानतेने व विचारपूर्वकच करा. हा शनि अनारोग्यकारक होणेही संभवते. संकटपरंपरा निर्माण करणारा हा शनि आहे. जपा. या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील गुरु बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना व लेखकवर्गाला अनुकुल ,
प्रगतिकारक व यशदायक होईल. पण नेपच्यूनमुळे मनस्थिती अति कोमल होणे संभवते. तसे झाल्यास संवेदनाही अति जलद होतील व मन उदास होऊन गहिरे नैराश्य येईल. या राशीच्या धनस्थानी मीन राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून ते दोन्ही ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होतील. रविमुळे विविध प्रकारे आर्थिक समस्या त्रस्त करतील. वाद, भांडणे होतील. काही मंडळींना डोळ्याचा आजार होणे संभवते. येथील बुध दु:खदायकच होईल; पण त्याच्यामुळे धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत शुक्र व हर्षल असे दोन ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात धनस्थानी असलेले रवि -बुध तृतीय

स्थानी येत आहेत. त्यावेळी रवि ग्रह पूर्णपणे अनुकुल होईल व त्याच्यामुळे उत्तम आरोग्य लाभेल. सर्व प्रकारे सुखसमाधान लाभेल. नोकरीत तुमच्या कार्यशैलीचा वरिष्ठांवर प्रभाव पडेल. काही भाग्यवान मंडळींना बढती, मानाचे स्थान किंवा एखादे उच्च पद मिळणेही शक्य आहे. पण बुधामुळे अकारण शत्रुत्व निर्माण होणे संभवते तसेच हितशत्रूंपासून धोका होणेही संभवते. जपा. या तृतीय स्थानी असणारा शुक्र अनुकूल होईल व त्याच्यामुळे काही मंडळींना भूमिलाभ तर काहींना धनलाभ होऊ शकेल. हर्षलमुळे बौद्धिकशक्ती, आकलनशक्ती, स्मरणशक्ती वाढेल. काही भाग्यवंत मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृषभ राशीत मंगळ व राहू असे दोन ग्रह असून ते दोन्ही ग्रह वाद, भांडणे, गैरसमज अशापैकी कारणानी कौटुंबिक सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी मिथुन राशीत जात आहे. त्यावेळी तो प्रतिकुलच होईल आणि संततीपैकी कोणाची तरी आचरणविषयक समस्या, कोणाचे मनाविरुद्ध आचरण अशापैकी कारणांनी संतति समस्या त्रस्त करील. काही मंडळींना स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करील. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी विशेष काळजी घ्यावी. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना मन:शांती देतील. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “श्रीशिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ ओम वसवे नमः:” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी “ओम वरुणाय नमः:” मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय नमः:” मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन -** या राशीच्या भाग्यस्थानी वृश्चिक राशीत केतु असून त्याच्यामुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. शिवाय या राशीच्या काही मंडळींकडून “ वरून कीर्तन आतून तमाशा “ अशा प्रकारचे ढोंगी आचरण होणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी मकर या स्वराशीत शनि असून तो सर्वसाधारण्पणे शुभ होईल. अर्थवाढ होईल. पण संततिविषयक चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. या राशीच्या व्ययस्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील गुरु ग्रह अध्यात्मात रस असणारांना व सामाजिक कार्याची आवड असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण कौटुंबिक जीवनात त्याच्यामुळे मनस्ताप व अपेक्षाभंग होणे संभवते. तसेच शक्यतो प्रवास करू नका. कारण प्रवासात अडचणी येणे संभवते. या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत रवि -बुध असे दोन ग्रह असून
ते दोन्ही ग्रह या महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. रविमुळे अनारोग्य, मनस्ताप, वाढत्या खर्चाची चिंता, वित्तहानी, भांडणे होणे संभवते. बुधामुळे मनस्थिती चंचल, अस्थिर

राहील व त्यातून  कुसंगती, धननाश,  मित्रद्रोह  अशापैकी  घटना  घडतील  व  दु:ख  होईल.  पण महिन्याच्या उत्तरार्धात  या  बुधामुळे धनलाभ  होण्याची  शक्यता  आहे. या  राशीच्या  धन स्थानी  शुक्र व  हर्षल  हे दोन ग्रह आहेतच.  शुक्रामुळे  वैवाहिक  जीवनातील सुखसमाधान  लाभेल;  पण  हर्षलमुळे स्वभाव  अस्थिर, चंचल, लहरी,  धाक-दडपण  सहन न होणारा  असा  घडण्याची  शक्यता आहे.  या  राशीची  लहान  मुले तर  अतिशय वांड, खोडकर  अशी  झाली  असण्याची  शक्यताही  दिसते.  पण हा हर्षल  शास्त्रीय  संशोधन  कार्यक्षेत्र असणारांना  अनुकुल, प्रगतिकारक  व यशदायक  होईल.  या  राशीच्या  तृतीय  स्थानी वृषभ  राशीत  मंगळ व राहू  असे दोन  ग्रह असून  ते दोन्ही  ग्रह अनुकुल  होतील.  मंगळामुळे धैर्य,  हिंमत, महत्त्वाकांक्षा, कर्तबगारी वाढेल.  प्रवासयोग येईल;  पण   होणे संभवते.  जपा. राहूमुळे  मन  दिलदार  व  हरहुन्नरी  होईल,  हातून कर्तृत्व  घडेल. पण या  राहुमुळे  बंधुसुखात  बाधा  येणे  संभवते.  महिन्याच्या  उत्तरार्धात  यथील  मंगळ  या राशीच्या  चतुर्थ स्थानी  मिथुन  राशीत जात  आहे. त्या काळात तो  प्रतिकुल  होईल  व  त्याच्यामुळे  कौटुंबिक जीवनातील  सुखात  बाधा  येईल. कौटुंबिक  जीवनात गैरसमज,  वाद,  भांडणे, असमाधानकारक घटना घडण्याची  शक्यता  आहे. श्रद्धा  असेल  तर  श्रीगुरुदेव  दत्तात्रेयाची  उपासना  मन:शांती  देईल.  दररोज सकाळी   झाल्यावर  “बावन्न श्लोकी  गुरुचरित्रा”चे  पठण करा. त्याशिवाय  दररोज सकाळी  स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे  जन्मनक्षत्र  पूर्वाभाद्रपदा  आहे  त्यांनी  “ओम  अजैकचरणाय नमः:” मंत्राचा, ज्यांचे  जन्मनक्षत्र  उत्तराभाद्रपदा  आहे  त्यांनी  “ ओम  अहिर्बुध्न्याय  नमः:” मंत्राचा  आणि ज्यांचे जन्मनक्षत्र  रेवती आहे  त्यांनी :”:ओम  पूषाय  नमः:”  मंत्राचा  १०८ वेळा  जप  करावा.

=====ooooo0ooooo=====